# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
०२०- २५६०१२५८
०२०- २५६०१२५९
संदर्भ : सीसीओ/2065

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in
दिनांक : 27/09/2018

मा. अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / संचालक
सर्व अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालये / संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक.

विषय : सहयोगी प्राध्यापक या पदाबाबत...

संदर्भ : उच्च तंत्र शिक्षण विभाग ठराव क्र. एसपीसी-२०१०/(३४/१०)/टीई-२, मंत्रालय, मुंबई-४०००३२, दि. २० ऑगस्ट २०१०.

महोदय,

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद यांनी निर्गमित केलेल्या निकषांनुसार व निवड समितीच्या शिफारशींनुसार ज्या उमेदवारांना पाचव्या वेतन आयोगानुसार सहायक प्राध्यापक म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे व अशा उमेदवारांनी ७ वर्षाचे आत पीएच.डी. उत्तीर्ण होण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आलेली आहे व त्यांची पीएच.डी. पूर्ण होऊन ३ वर्षे झालेले आहेत अशा काही शिक्षकांनी सहयोगी प्राध्यापक म्हणून मान्यता मिळण्यासाठी खाली नमूद केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने या विभागात अर्ज सादर केलेले आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. २० ऑगस्ट २०१० रोजीच्या ठरावातील मुद्दा क्र. २ मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे.

"Incumbent Assistant Professor and Incumbent Lecturers (Selection Grade) who have completed 3 years in the pre-revised pay scale of Rs.12000-18300 on 1.1.2006 shall be placed in Pay Band of Rs.37400-67000 with AGP of Rs.9000 and shall be re-designated as Associate Professor".

उपरोक्त बाब विचारात घेता संबंधित महाविद्यालये / संस्थांनी आवश्यक असणारी कागदपत्रे या विभागात सादर करावीत.

अ) संबंधित संस्थेच्या नावाचे पत्र (Covering letter)
ब) संस्थेने गठीत केलेल्या किमान दोन सदस्यांची समितीने शिफारस केलेल्या स्वाक्षरीचे स्पष्ट अहवाल व त्यासोबत आवश्यक असलेली साक्षांकित असलेली कागदपत्रे खालीलप्रमाणे :
१) संबंधित शिक्षकाचे प्रथम नियुक्तीचे पत्र

२) रूजू अहवाल
३) कायमस्वरूपी शिक्षक मान्यतापत्र
४) विद्यापीठाने पीएच.डी.च्या अधीन राहून दिलेले मान्यतापत्र
५) संबंधित शिक्षकांचे पीएच.डी. उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र
६) संबंधित शिक्षकांची पीएच.डी.ची अट काढून टाकल्याचे विद्यापीठाचे पत्र
७) संबंधित शिक्षकांचे सलग ३ वर्षे त्याच महाविद्यालयात सद्यस्थितीत शिकवित असल्याचे अनुभवाचे पत्र
८) भविष्यात याबाबत काही आर्थिक, न्यायालयीन बाबी उद्‌भवल्यास त्याची सर्व जबाबदारी संस्थेची राहील अशा आशयाचे सचिव/अध्यक्ष यांच्या सहीचे हमीपत्र

तरी सर्व संबंधित महाविद्यालये / संस्थांनी सर्व कागदपत्रे ही दि. ३१ ऑक्टोबर, २०१८ पर्यंत या विभागात सादर करावीत. त्यानंतर सादर केलेल्या कोणत्याही प्रस्तावांवर कार्यवाही केली जाणार नाही.

कळावे,

आपला,

२४/८/१८

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)